Capgemini

कॅपजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : नं.१४, राजीव गांधी इन्फोटेक पार्क, हिंजावाडी, फेज-III,
एमआयडीसी-एसईझेड, व्हिलेज मान, तालुका मुळशी, पुणे - ४११ ०५७, महाराष्ट्र, भारत
टेलि क्र.: +९१-२०-६६९९-२००० **फॅक्स क्र.:** +९१-२०-६६९९-५०५०
सीआयएन : यू८५११०पीएन१९९३पीएलसी१४५९५०
ईमेल आयडी: cgcompanysecretary.in@capgemini.com
वेबसाईट: https://www.in.capgemini.com/in.en/what-we-do/group-overview/ capgemini-technology-services-india-limited-formerly-known-as-igate-global-solutions-limited/

फॉर्म नं. सीएए.२
[(कलम २३० (३) आणि नियम ६ व ७च्या अनुसार)]

कंपनी योजना अर्ज (सीएए) / ५६ (एमबी) २०२२

कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम २३०-२३२ आणि त्याखालील तयार केलेल्या नियमांसह वाचलेले या अंतर्गत **कॅपजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड ("हस्तांतरिती कंपनी" / "कंपनी")** आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या समवेत ऑरिसंट टेक्नोलॉजीस (होल्डिंग्ज) लिमिटेड **("हस्तांतरक कंपनी")** दरम्यान एकत्रीकरण योजनेच्या प्रकरणात

समन्याय भागधारक आणि असुरक्षित धनकोंच्या सभांच्या सूचनेची जाहीरात

याद्वारा सूचना देण्यात येते की दिनांकित १० जून, २०२२ आदेशाद्वारा, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई बेंचने कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम २३०-२३२च्या तरतुदी आणि त्याकरिता अन्य लागू तरतुदी आणि लागू नियमांतर्गत कॅपजेमिनी टेक्नोलॉजी सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड **("हस्तांतरिती कंपनी" / "कंपनी")** आणि त्यांचे संबंधित भागधारक यांच्या समवेत ऑरिसंट टेक्नोलॉजीस (होल्डिंग्ज) लिमिटेड **("हस्तांतरक कंपनी")** दरम्यान प्रस्तावित एकत्रीकरण योजना **("योजना")**, फेरबदलसह किंवा फेरबदलशिवाय, जसे उचित वाटेल तसे, विचारात घेण्याच्या हेतुप्रित्यर्थ हस्तांतरिती कंपनीच्या समन्याय भागधारक आणि असुरक्षित धनकोंच्या स्वतंत्र सभा घेण्यास निदेशीत केले आहे.

उक्त आदेश आणि त्यात निदेशित केल्यानुसार, कंपन्या अधिनियम २०१३च्या (**"कायदा"**) लागू तरतुदी आणि त्याखालील निर्गमित सक्युर्लरच्या, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, अनुपालनार्थ याद्वारा अधिक सूचना देण्यात येते की कंपनीचे समन्याय भागधारक आणि असुरक्षित धनकोंची स्वतंत्र सभा तारीख व वेळेत, याखाली नमूद केलेल्या अनुसूचीनुसार व्हिडिओ कॉन्फरन्सींग / अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स (**"व्हिसी / ओव्हिएएम"**) द्वारा घेण्यात येणार आहे. उक्त समन्याय भागधारक आणि असुरक्षित धनकोंना विनंती करण्यात येते की त्यांना सभेत उपस्थित राहावे :

अनु.क्र.	सभांचा वर्ग	वेळ (भाप्रवे)	सभेची तारीख
१.	समन्याय भागधारक	स.११:०० वा	शुक्रवार, २९ जुलै, २०२२
२.	असुरक्षित धनको	दु.०३:०० वा	शुक्रवार, २९ जुलै, २०२२

कंपनीने समन्याय भागधारक आणि असुरक्षित धनकोंच्या संबंधित सभांमध्ये मंजूर करावयाचा प्रस्ताव, ठरावावर त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता, जेणेकरून ते सक्षम होतील, केफिन टेक्नोलॉजीस लिमिटेडद्वारा (पूर्वीची केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) (**"केफिन"**), कंपनीची रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजन्ट, पूर्वोक्त सभांदरम्यान (**"इन्स्टा पोल"**) ई-वोटींग आणि रिमोट इलेक्ट्रॉनिक वोटींग (**"रिमोट ई-वोटींग"**) द्वारा मतदान करण्याबाबत सुविधेची तरतूद करून दिलेली आहे. "व्हिसी / ओव्हिएएम"द्वारा सभांमध्ये सहभागी होण्याकरिता सविस्तर सूचना सभांच्या सूचनांच्या नोंदीमध्ये देण्यात आल्या आहेत.

पूर्वोक्त सभांच्या सूचना, सदर बाबतीतील कागदपत्रांसमवेत, याखाली नमूद केल्यानुसार पाठविण्यात आल्या आहेत:

ए) २७ जून २०२२ रोजी किंवा तत्पुर्वी समन्याय भागधारकांकरिता, ज्यांची नावे १७ जून, २०२२ रोजी प्रमाणे सदस्यांच्या नोंदवहीत / लाभाधिकारी मालकांच्या यादीत आलेली आहेत

i. समन्याय भागधारकांकरिता, ज्यांचे ई-मेल आयडी'ज केफिन/डिपॉझिटरिजकडे नोंदणीकृत आहेत, इलेक्ट्रॉनिक प्रणालीत; आणि

ii. समन्याय भागधारकांकरिता, ज्यांचे ई-मेल आयडी'ज केफिनकडे नोंदणीकृत नाहीत, रजिस्टर्ड पोस्ट किंवा कुरिअरद्वारा.

बी) २७ जून २०२२ रोजी किंवा तत्पूर्वी सुरक्षित धनकोंकरिता, ज्यांची नावे कंपनीकडे नोंदणीकृत असल्यानुसार ई-मेल आयडी'ज वर इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा ३१ डिसेंबर, २०२१ रोजी नुसार कंपनीच्या रेकॉर्डमध्ये आलेली आहेत.

सभांच्या सूचना, कंपन्या (समझौता, व्यवस्थापन व एकत्रीकरण) नियमस २०१६ च्या नियम ६ आणि कायद्याच्या अन्य लागू तरतुदी तसेच कलम १०२ यासह वाचलेल्या कलम २३० व २३२ अंतर्गत स्पष्टिकरणात्मक विवरणासह योजनेची प्रत https://www.capgemini.com/in.en/what-we-do/group-overview/capgemini-technology-services-india-limited-formerly-known-as-igate-global-solutions-limited/ या कंपनीच्या वेबसाईटवरून आणि https://evoting.kfintech.com/ या केफिनच्या वेबसाईटवरून सुद्धा प्राप्त करता येतील. ही कागदपत्रे सभेच्या तारखेपर्यंत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून स. १०.०० व सायं ०५.०० दरम्यान कामकाजाच्या सर्व दिवशी विनामूल्य किंवा cgcompanysecretary.in@capgemini.com या कंपनीच्या वेबसाईटवर ईमेल पाठवून सुद्धा प्राप्त करता येतील.

पूर्वोक्त सभांच्या ई-वोटींगकरिता कट-ऑफ तारीख (रिमोट ई-वोटींग समाविष्ट) व वेळ आणि रिमोट ई-वोटींगकरिता कालावधी खालीलप्रमाणे आहे-

तपशील	समन्याय भागधारकांची सभा	असुरक्षित धनकोंची सभा
कट-ऑफ तारीख	शनिवार, २३ जुलै, २०२२	शुक्रवार, ३१ डिसेंबर, २०२१
रिमोट ई-वोटींग सुरू होणारी तारीख व वेळ	मंगळवार, २६ जुलै, २०२२ (स. ०९.०० वा)	मंगळवार, २६ जुलै, २०२२ (स. ०९.०० वा)
रिमोट ई-वोटींग बंद होणारी तारीख व वेळ	गुरुवार, २८ जुलै, २०२२ (सायं ०५.०० वा)	गुरुवार, २८ जुलै, २०२२ (सायं ०५.०० वा)

सभांकरिता, रिमोट ई-वोटींगद्वारा मतदान करण्यासाठी सुविधा वेळेनंतर, वर नमूद केल्यानुसार, निःसमर्थ करण्यात येईल.

सदस्य / धनको, जे रिमोट ई-वोटींग करू इच्छितात, तेच केवळ सभांमध्ये उपस्थित राहणे आणि सहभागी होण्यास हक्कदार असणार आहेत, परंतु सभांदरम्यान कालावधीत पुन्हा मतदान करण्यास हक्कदार नसतील.

सदस्य, ज्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या सदर ई-मेल पत्त्यांची डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे, डिमॅट स्वरूपात असलेल्या भागांसंबंधित, नोंदणी करावी.

समन्याय भागधारक, ज्याचे नाव वरील कट-ऑफ तारखेनुसार डिपॉझिटरीजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या सदस्यांच्या नोंदवहीत / यादीत अभिलिखित आहे, तोच केवळ समन्याय भागधारकांच्या सभेत हजर राहण्यास आणि ई-वोटींगची सुविधेचा लाभ घेण्यास हक्कदार असेल. समन्याय भागधारकांचा मतदानाचा हक्क वरील कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या भाग भांडवलात असलेल्या त्यांच्या भागांच्या प्रमाणशीर असेल.

असुरक्षित धनको, ज्यांची नावे वरील कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या रेकॉर्डसमध्ये अभिलिखित आहेत तेच केवळ ई-वोटींग सुविधेचा लाभ घेण्यास आणि असुरक्षित धनकोंच्या सभेमध्ये हजर राहण्यास हक्कदार असतील. असुरक्षित धनकोंचे मतदानाचे हक्क कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या बुक्समधील अभिलिखित ऋणांच्या मूल्याशी प्रमाणबद्ध असतील.

जर कोणतीही व्यक्ती सूचना पाठविल्यानंतर परंतु कट-ऑफ तारखेस किंवा त्यापूर्वी भागधारक बनते किंवा तिने सूचना पाठविल्यानंतर ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला आहे, तर सदर सदस्य सभांच्या सूचनेतील नमूद केलेल्या प्रक्रियेत युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल.

सभांचे आयोजन "व्हिसी / ओव्हिएएम"द्वारा होत असल्यामुळे, प्रॉक्सिजच्या नेमणुकीकरिता सुविधा सभांकरिता उपलब्ध असणार नाही. तथापी, इन्स्टिट्यूशनल / कॉर्पोरेट भागधारक व धनको, इ. सभांमध्ये सहभागी होण्याकरिता रिमोट ई-वोटींगद्वारा मतदानाच्या हेतुप्रित्यर्थ त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींची नेमणूक करण्याकरिता हक्कदार असतील.

माननीय न्यायाधिकरणाने, त्याकरिता कोणतीही स्थगिती समाविष्ट, सभांकरिता अध्यक्ष म्हणून श्री. हरनाम सिंह (निम्नस्वाक्षरीकार), निवृत्त आयएएस यांची नियुक्ती केली आहे. याअधिक, न्यायाधिकरणाने, त्याकरिता कोणतीही स्थगिती समाविष्ट, सभांकरिता परिनिरीक्षक म्हणून श्री. शैलेश इंदापूरकर (एसीएस १७३०६) यांची नियुक्ती केली आहे.

सभांचा निकाल परिनिरीक्षकांच्या अहवालाच्या स्वीकृतीवर सभांच्या समाप्तीच्या कामकाजाच्या दोन (२) दिवसांच्या आत सभांच्या अध्यक्षद्वारा घोषित करण्यात येणार आहे आणि सदर निकाल https://www.capgemini.com/in.en/what-we-do/group-overview/ capgemini-technology-services-india-limited-formerly-known-as-igate-global-solutions-limited/ या कंपनीच्या वेबसाईटवर आणि https://evoting.kfintech.com/ या केफिनच्या वेबसाईटवर प्रस्तुत करण्यात येणार आहे.

ई-वोटींगसंबंधित कोणत्याही शंका / तक्रारी असल्यास, समन्याय भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या शंका, जर असल्यास, सभेच्या किमान ७ दिवस आधी, जेणेकरून माहिती आधीच संकलित करता येईल, cgcompanysecretary.in@capgemini.com यावर कंपनीला ई-मेलद्वारा पाठवाव्यात.

स्वाक्षरी/-
हरनाम सिंह
निवृत्त आयएएस
समन्याय भागधारक व असुरक्षित धनकोंच्या
सभेकरिता नियुक्त केलेले अध्यक्ष

स्थळ: मुंबई
तारीख: २८ जून, २०२२